२५ वर्षे विश्वासार्हतेची

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २४७ ✻ सातारा ✻ मंगळवार ✻ दि. २१ मे २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# देशात ५६.६८ टक्के मतदान

## महाराष्ट्रात सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदान ! मतदार यादीतून नावे गायब, मतदारांमध्ये उदासीनता



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडलं. देशात एकूण ५६.६८ टक्के मतदान झालं. देशात सर्वाधिक मतदान पश्चिम बंगालमध्ये ७३ टक्के तर महाराष्ट्रात सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदान झाले आहे. मतदार यादीतून अनेक मतदारांची नावे गायब असल्याने लाखो मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले.

सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरूवात झाली. उष्णता अधिक असतानाही मतदार मतदानासाठी घराबाहेर पडले होते. अनेक ठिकाणी मतदान केंद्रावर रांगा लागल्या होत्या. तर मतदार यादीत नावे नसल्याने अनेकांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही त्यामुळे मतदारांनी निवडणूक आयोगावर संताप व्यक्त केला. गेली अनेक वर्षे आम्ही मतदान करीत असताना यावेळी आमची नावे डिलीट कशी झाली असा सवाल मतदारांकडून विचारण्यात आला. तसेच मृत व्यक्तींची नावे मतदार यादीत आढळून आली. एकाच कुटूंबातील अनेकांची नावे गायब झाली होती. ज्येष्ठ नागरिकांची नावे मोठया प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले. मतदार यादीत नावे नसल्याने अनेक मतदान केंद्रावर गोंधळ उडाल्याचा दिसून आला. तसेच मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने अनेक मतदारांनी संताप व्यक्त केला. मतदारांना गैरसोयीला सामोरे जावे लागल्याचे दिसून आले. तसेच अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याचेही प्रकार घडले.

**महाराष्ट्रातील मतदान**

| | |
|---|---|
| धुळे | ४८.८१ टक्के |
| दिंडोरी | ५७.०६ टक्के |
| नाशिक | ५१.१६ टक्के |
| पालघर | ५४.३२ टक्के |
| भिवंडी | ४८.८९ टक्के |
| कल्याण | ४१.७० टक्के |
| ठाणे | ४५.३८ टक्के |
| मुंबई उत्तर | ४६.९१ टक्के |
| मुंबई उत्तर मध्य | ४७.३२ टक्के |
| मुंबई उत्तर पूर्व | ४८.६७ टक्के |
| मुंबई उत्तर पश्चिम | ४९.७९ टक्के |
| मुंबई दक्षिण | ४४.२२ टक्के |
| मुंबई दक्षिण मध्य | ४८.२६ टक्के |

महाराष्ट्रासह काही ठिकाणी मतदान प्रक्रियेला विलंब झाला होता त्यामुळे मतदानकेंद्राबाहेर रांगेत उभे असलेल्या मतदारांना ६ नंतरही मतदान करण्यासाठी केंद्र सुरू ठेवण्यात आली होती मुंबई आणि नाशिकमध्ये मतदान केंद्रावर बराच गोंधळ पहायला मिळाला मुंब्रयात तर चार चार तास मतदारांना रांगेत उभे राहावे लागले त्यामुळे संध्याकाळी ७ नंतरही काही मतदारसंघात मतदान सुरू होतं. मुंबईतील कुलाब्यात ठाकरे गट आणि भाजप पदाधिका-यांमध्ये राडा झाला होता तर अनेक ठिकाणी ईव्हीएम मशीन बंद पडल्याने मतदारांना अर्धा ते पाऊणतास ताटकळत रांगेत उभे राहावे लागले.

**देशात झालेलं मतदान**

| | |
|---|---|
| बिहार | ५२.३५ |
| जम्मू काश्मीर | ५४.२१ |
| झारखंड | ५१.९० |
| लडाख | ६७.५० |
| महाराष्ट्र | ४८.६६ |
| ओडिसा | ६०.५५ |
| उत्तरप्रदेश | ५५.८० |
| पश्चिम बंगाल | ७३ |

### कल्याणात सर्वात कमी ४१.७० टक्के मतदान

राज्यातील मुंबईतील सहा मतदारसंघ तसेच भिवंडी नाशिक दिंडोरी धुळे ठाणे कल्याण आणि पालघर या १३ मतदार संघापैकी कल्याण लोकसभा मतदार संघात सर्वात कमी ४१ ७० टक्के मतदान झालं तर दिंडोरीत सर्वाधिक ५७ ०६ टक्के मतदान झाले. कल्याणातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपूत्र डॉ श्रीकांत शिंदे हे निवडणूक लढवीत आहे त्यामुळे इथल्या निवडणुकडे विशेष लक्ष असतानाच कमी मतदान झाल्याने या ठिकाणी धक्कादायक निकाल लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी संध्याकाळी सात वाजेपर्यंत मतदान सुरू होतं त्यामुळे मतदानाची आकडेवारी वाढण्याची शक्यता आहे.

# एवढे कष्ट स्वत:च्या पक्षासाठी घेतले असते तर...'

## मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर संजय राऊत यांची टीका

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीतील मुंबईतील मतदानाच्या दिवशी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महायुतीला बिनशर तर पाठिंबा देणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर कडाडून टीका केली. या निवडणुकीसाठी राज ठाकरे जेवढे कष्ट घेत आहेत तेवढे कष्ट त्यांनी आपल्या पक्षासाठी घेतले असते तर किमान त्यांच्या कार्यकर्त्यांचे तरी भले झाले असते, असे राऊत पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

या निवडणुकीसाठी भाजपने अनेकांना भाड्याने घेतले आहे. आमच्यामुळे त्यांना रस्त्यावर उतरून फिरावे लागत आहे. एकेकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना महाराष्ट्रात पाऊल ठेवू देणार नाही, असे म्हणणारे आज त्यांच्या पखाली वाहत आहेत, हे पाहून आम्हाला वाईट वाटते, असेही राऊत म्हणाले.

आम्हाला पराभवाची भीती वाटत नाही. राज्यातील लोकसभेच्या जागांपैकी ३५ जागा महाविकास आघाडी सहज जिंकेल. पराभवाची भीती भाजप आणि महायुतीला आहे. त्यामुळे ते यंत्रणांचा दुरुपयोग करून पैशाचे वाटप करीत आहेत, असा आरोपही त्यांनी केला. घाटकोपरमध्ये श्रीरामांचे बॅनर्स लावण्यात आल्याकडे त्यांचे लक्ष वेधले असता राऊत म्हणाले की, पराभवाच्या भीतीने यांनी प्रत्यक्ष श्रीरामांनाही प्रचाराच्या मैदानात उतरवले आहे.

स्वतः रावणही हिंदुत्ववादी होता. त्यानेही आपल्या विरोधकांना आणि देवांनाही कैदेत टाकले होते. तरीही रावणाचा पराभव झाला. हे रावण कोण आणि कंस कोण, हे सांगण्याची आवश्यकता नाही असेही राऊत म्हणाले.



# पुण्यातील हिट अँण्ड रनप्रकरणी कठोर कारवाईचे देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यातील पोर्श गाडी अपघात प्रकरणाची देवेंद्र फडणवीसांकडून दखल घेण्यात आली आहे. पुण्यातील हिट अँण्ड रनप्रकरणी कठोर कारवाईचे आदेश देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिसांशी फोनवरून चर्चा केली.

पुणे शहरातील कल्याणी नगर परिसरात रविवारी पहाटे नंबरप्लेट नसलेल्या पोर्श या अलिशान गाडीने मोटरसायकलला धडक दिल्याची घटना घडली होती.

पुणे शहरातील कल्याणी नगर परिसरात रविवारी पहाटे नंबरप्लेट नसलेल्या पोर्श या अलिशान गाडीने मोटरसायकलला धडक दिल्याची घटना घडली होती. या घटनेत दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला. या भीषण अपघात अपघातातील पोर्शे कार आणि त्या कारचा चालक हा अल्पवयीन (वय १७) वर्षांचा आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या अपघात प्रकरणात १७ वर्षांच्या अल्पवयीन आरोपीला जामीन मंजुर झाला होता. पुण्यातील एका बड्या बांधकाम व्यावसायीकाचा मुलगा ही अलिशान कार चालवत होता. या अपघाताचा व्हिडीओही आता समोर आला आहे.

१७ वर्षीय मुलाला न्यायालयाने काही अटींवर जामीन मंजूर केला. तसेच अपघातावर ३०० शब्दाचा निबंध लिहावा, असे आदेश दिले होते. यानंतर आता या अपघाताची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. तसेच या घटनेतील आरोपीवर कठोर कारवाईचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या घटनेसंदर्भातील माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिस आयुक्तांना फोन करून घेतली, तसेच तात्काळ कारावाईचे आदेश दिले आहेत.

या अपघातातील आरोपीला जामीन मिळाला असला तरी त्याविरुद्ध अपील दाखल करण्याच्या सूचना पुणे पोलिस आयुक्तांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आल्याची माहिती आहे. याबरोबरच या प्रकरणातील आरोपीला कोणती विशेष ट्रिटमेंट दिली असल्यास त्यावेळचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासून ते खरे असेल तर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, या अपघातामुळे एकच खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहे. आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# लाखो प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या निष्ठेसमोर नतमस्तक

## चंद्रशेखर बावनकुळे यांचे कार्यकर्त्यांना भावनिक पत्र

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा निवडणुकीसाठी पाचव्या व महाराष्ट्रातील अंतिम टप्प्याचे मतदान सोमवारी (ता. २०) पार पडले. मतदान झाल्यानंतर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आभार व्यक्त करणारे पत्र भाजपा कार्यकर्त्यांना लिहिले आहे. घरदार विसरून, अथक परिश्रम करून कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान त्यांनी व्यक्त केला आहे.

भाजपा कार्यकर्त्यांना लिहिलेल्या पत्रात बावनकुळे यांनी, भाजपा कार्यकर्ते प्रत्येक गाव-खेड्यापर्यंत मोदीजींच्या विकसित भारताचं स्वप्न घेऊन पोहोचल्याचा उल्लेख केला आहे.

पत्रातून आपल्या भावना व्यक्त करताना बावनकुळे म्हणाले की, या निवडणुकीचा प्रवास बूथ समित्यांपासून सुरू झाला आणि तो लाखोंच्या सभांपर्यंत विस्तारत गेला.

बूथ समिती, शक्ती केंद्र प्रमुख, विस्तारक, सुपर वॉरियर्स, सोशल मीडिया संयोजक यांच्यासह हजारो कार्यकर्ते, संघटनेतील पदाधिकारी यांच्यासह माझे विधिमंडळातील सर्व आजी-माजी सहकारी निवडणुकीच्या रिंगणात कार्यरत होते, असा उल्लेखही त्यांनी पत्रातून केला आहे.

राष्ट्रप्रेमाने भारलेल्या लाखो कार्यकर्त्यांची अखंड मेहनत हाच आपल्या पक्षाच्या यशाचा बलदंड पाया आहे,

भाजपाचे कार्यकर्ते अविश्रांत राबल्यामुळे निवडणुकीत मोठ्या यशाला गवसणी घालणार असून ४ जूनला सर्वजण मिळून जल्लोष करू आणि महायुतीचा झेंडा अभिमानाने फडकवू, असा विश्वासही त्यांनी पत्रातून व्यक्त केला.

# पब संस्कृती विरोधात शिवसेनेचा एल्गार

## पब बार वर प्रशासनाने करडी नजर ठेवावी : शिवसेना

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पुणे पक्षाच्या वतीने आज पुणे पोलिस आयुक्त यांची भेट घेऊन पब बार ड्रग्ज विषयात निवेदन देण्यात आले.

पुणे हे विद्येचे माहेर घर की पब संस्कृतीचे? हा प्रश्न दिवसेंदिवस आता पुणेकरांना पडत आहे, पुणे शहरातील कोरेगाव पार्क, कल्याणी नगर, ताडिवाला रोड, बाणेर, बालेवाडी भागात पब, डिस्कोबार, यांचा सुळसुळाट झाला आहे. पोलिस प्रशासनाच्या आशीर्वादाने मध्यरात्री पर्यंत हे पब बार सुरु असतात. यामध्ये येणारा वर्ग पाहता यात अल्पवयीन मुले-मुली, विद्यार्थी, तरुण तरुणी,



व्यावसायिक, यांची रेलचेल दिसते. अल्पवयीन मुलांना सर्रासपणे दारु विक्री केली जात आहे. यातूनच गुन्हेगारी, बलात्कार, छेडछाडीच्या घटना घडत असतात. कायद्याचे इथे सर्रास पणे उल्लंघन चालू असून रात्रभर चालणाऱ्या ह्या बार पब मुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, यातूनच परवा दारूच्या नशेतील वेदांत अगरवाल या युवकाच्या हातून २ निष्पाप लोकांचा बळी गेला आहे, या आधीही अश्या अनेक घटना घडल्या आहेत. तसेच पुण्यात ड्रग्ज चे प्रमाणही वाढले असून या पब संस्कृती मधे याचा सर्रास पणे वापर होत आहे. त्यामुळे देशातील तरुणाई नशेकडे झुकत चालली आहे आपण तत्पर या सर्व रात्रभर चालणाऱ्या पब, बार, हुक्कापार्लर वर कारवाई करावी अन्यथा शिवसेनेला या विषयात आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल असे शिवसेनेच्या वतीने निवेदन देऊन कळविण्यात आले.

यावेळी पोलिस आयुक्तांनी शिष्टमंडळाला सहकार्याची भूमिका घेत यापुढे शहरात कडक कारवाईचे धोरण अवलंबिले जाईल असे आश्वासन दिले पण रात्री १.३० पर्यंत वेळेचं निर्बंध हा विषय राज्यशासनाने लागू केल्यामुळे त्यात आम्ही काही करू शकत नाही असेही कळविले .

शहर शिवसेनेच्या वतीने यावेळी राज्यशासनाकडे सदर विषयात कडक धोरण अंबालाबाजावणीसाठी पाठपुरावा करू असे सांगण्यात आले.

यावेळी शहरप्रमुख संजय मोरे , गजानन थरकुडे, उपशहरप्रमुख आनंद गोयल, उमेश वाघ, विभागप्रमुख राजेश मोरे, प्रसिद्धी प्रमुख अनंत घरत, नाना वाळके, उपस्थित होते.

# पुणेकरांना दोन महिने पुरेल इतकेच धरणांत पाणी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील चारही धरणांमध्ये मिळून एकूण ६.७० टीएमसी म्हणजे २३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा २.३० टीएमसीने पाणीसाठा कमी आहे. शहराला दोन महिने पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आहे त्या पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन पुणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

मागील वर्षी सरसरीपेक्षा कमी पावसामुळे पानशेत, खडकवासला साखळी प्रकल्पातील चारही धरणे कशीबशी १०० टक्के भरली. मात्र, त्यानंतर परतीच्या पावसाने पाठ फिरवल्याने धरणात पुन्हा पाणीसाठा जमा झाला नाही. त्यामुळे सुरुवातीपासूनच खडकवासला प्रकल्पात कमी पाणीसाठा होता.

सद्यःस्थितीत टेमघर धरणे रिकामे झाले असून, धरणात अवघे ४.९९ टक्के म्हणजेच ०.१९ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी खडकवासला साखळी प्रकल्पातील धरणात नऊ टीएमसी म्हणजेच ३०.८७ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. यंदा प्रकल्पात ६.७० टीएमसी म्हणजे २३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. सध्या पुणे शहराच्या ग्रामपंचायत आणि उपनगरात पिण्याच्या पाण्याचा टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. टँकर्स आल्यास मोठ्या प्रमाणात पाण्यासाठी गर्दी होत आहे.

पुणे शहराला १५ जुलैपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा खडकवासला प्रकल्पात राखीव ठेवला आहे, असा दावा पाटबंधारे आणि महापालिका प्रशासनाकडून सुरुवातीपासूनच करण्यात येत आहे. मात्र मागील काही वर्षांपासूनचा पावसाचा अंदाज पाहता मॉन्सूनचे वेळेवर आगमन होते. मात्र, त्यानंतर पाऊस लांबणीवर पडतो. त्यामुळे शहरासमोर पाणीकपातीचे संकट उभे राहत आहे. त्यामुळे पाण्याचे आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. तर, यावर्षी चांगला पाणीसाठा होणार असल्याचे हवामान खात्याने अंदाज व्यक्त केला आहे.

# निवडणूक आयोगाकडून पक्षपातीपणा, मतदानाला जाणीवपूर्वक विलंब

## उध्दव ठाकरे संतापले

**मुंबई :** मतदारांमध्ये खूप उत्साह आहे पण निवडणूक आयोगाकडून पक्षपातीपणा सुरू आहे. मशीन बंद पाडले जातात. मतदानाला जाणीवपूर्वक विलंब करीत असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत केले. निवडणूक आयोग भाजपची चाकरी करतोय असे गंभीर आरोपही ठाकरे यांनी यावेळी करीत संताप व्यक्त केला.

राज्यात मतदानाचा शेवटच्या टप्प्याचे मतदान सुरू असतानाच शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर आणि मोदी सरकारवर घणाघात केला. उद्धव ठाकरे म्हणाले, दफ्तर दिरंगाई ज्याला म्हणतात तशी दिरंगाई मतं नोंदवताना केली जात आहे. मी नागरिकांना आवाहन करतोय, आता थोडा वेळ जरी राहिला असला तरी तुमच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नका. आपण मतदानकेंद्रांमध्ये जावून उभे राहा आणि जे निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी आहेत त्यांना पहाटे पाच वाजेपर्यंत सोडू नका. तुमचं मतदान केल्याशिवाय सोडू नका. तुमच्या मतदानाचा हक्क बजावल्याशिवाय बाहेर पडू नका, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी मतदारांना केले.

दरम्यान निवडणूक आयोगाने मतदान केंद्रात संध्याकाळी सहा वाजेच्या आत आलेल्या मतदारांना टोकण देऊन मतदान करण्याची मुभा दिली.

निवडणूक प्रतिनिधी किंवा अधिका-यांची नावे शाखेत कळवा

ठाकरे म्हणाले की, या माध्यमातून मी पोलिंग एजंटला सांगतोय, तसेच निवडणुकीला जाणाऱ्या मतदारांनाही सांगतोय की, असं कुठलंही मतदान क्षेत्रामध्ये जी केंद्र आहेत, जिथे तुम्हाला मुद्दाम उशिर केला जातोय त्याची नोंद ताबोडतोब तिथल्या शिवसेनेच्या शाखेत करा. आपण मतदानाला गेल्यानंतर आपला आयडी बघतो तसं त्या निवडणूक प्रतिनिधींचा आयडीदेखील बघा, जेणेकरुन उद्या आपल्याला न्यायालयात दाद मागितली जाईल. मला त्यांची माहिती मिळाली की, मी त्यांची नावे आणि स्थळांची माहिती पत्रकार परिषद घेऊन जाहीर करुन टाकेन, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

या माध्यमातून मी पोलिंग एजंटला सांगतोय, तसेच निवडणुकीला जाणाऱ्या मतदारांनाही सांगतोय की, असं कुठलंही मतदान क्षेत्रामध्ये जी केंद्र आहेत, जिथे तुम्हाला मुद्दाम उशिर केला जातोय त्याची नोंद ताबोडतोब तिथल्या शिवसेनेच्या शाखेत करा. आपण मतदानाला गेल्यानंतर आपला आयडी बघतो तसं त्या निवडणूक प्रतिनिधींचा आयडीदेखील बघा, जेणेकरुन उद्या आपल्याला न्यायालयात दाद मागितली जाईल. मला त्यांची माहिती मिळाली की, मी त्यांची नावे आणि स्थळांची माहिती पत्रकार परिषद घेऊन जाहीर करुन टाकेन, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

**सर्वात आधी आम्ही आयोगाकडे तक्रार केली, ठाकरेंचे नेहमीचेच रडगाणे : फडणवीस**

मुंबईत संथ गतीने मतदान होत असल्याची तक्रार सर्थप्रथम आम्हीच आयोगाकडे केली आता मात्र नेहमीप्रमाणे उध्दव ठाकरे यांनी त्यांचे रडगाणे सुरू केले आहे असं म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. ठाकरेंनी मोदी यांच्यावरही गंभीर आरोप केले होते. फडणवीस यांनी ट्वीट करीत प्रत्युत्तर दिलं आहे. माझी तमाम मुंबईकरांना विनंती आहे की मतदान केंद्रावर जा आणि मोठया संख्येने मतदान करा सहा वाजले तरी जितके लोक आतमध्ये असतील त्या प्रत्येकाला मतदान करता येते त्यामुळे मतदानाचा आपला हक्क बजावल्याशिवाय राहू नका असेही फडणवीसांनी आवाहन केले आहे.

# कुणालाही पाठीशी घालू नका; पुणे पोर्शे अपघात प्रकरणी CM एकनाथ शिंदेंचे पोलिसांना निर्देश



**पुणे :** शहरातील कल्याणीनगर भागात झालेल्या पोर्शे कार अपघातामुळे राज्यासह देशभरात संताप व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेतील आरोपींना तातडीने जामीनही मिळाला त्यामुळे नागरिकांमध्ये रोष आहे. वेदांत अगरवाल असे आरोपीचे नाव असून, तो अल्पवयीन असल्याचे सांगितले जात आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्याच्या पोलीस आयुक्तांशी फोनवर संपर्क साधला आणि कुणालाही पाठीशी घालू नका, असे निर्देश दिल्याची माहिती देण्यात आली आहे.

मी कार चालविण्याचे रीतसर प्रशिक्षण घेतलेले नाही, वाहन चालविण्याचा परवानाही नाही, तरीदेखील वडिलांनीच त्यांच्या मालकीची ग्रे रंगाची पोर्श कार माझ्याकडे दिली, तसेच मित्रांसमवेत हॉटेलमध्ये पार्टी करण्यास परवानगी दिली. मी मद्यप्राशन करीत असल्याचेही वडिलांना माहिती आहे, असे अल्पवयीन आरोपीने पोलिसांना सांगितले. यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकरणाची दखल घेत पोलिसांना निर्देश दिले होते. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयुक्तांशी संवाद साधला.

**कुणालाही पाठीशी घालू नका**

मिळालेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना फोन केला. याप्रकरणात कुणालाही पाठीशी न घालता किंवा राजकीय दबावाला बळी न पडता कठोर कारवाई करा, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. दुसरीकडे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या. तसेच कारवाईत दिरंगाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारण्याचे संकेत दिले. याशिवाय, या प्रकरणात आरोपीला कोणती विशेष वागणूक दिली असल्यास, त्यावेळचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही तपासून ते खरे असेल तर तत्काळ संबंधितांवर निलंबनाची कारवाई करा, असे आदेश देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

## संपादकीय

### चार वेळा विश्वविक्रम

व्यायाम करणं हा अनेक लोकांचा छंद असतो. कायम उठून जिमला जाणारे, सतत फिटनेसचा विचार करणारे असे अनेक लोक असतात. सगळ्यांच्याच आजूबाजूला ते असतात. आणि ही अशी खूप व्यायाम करणारी, सकाळी उठून पळायला जाणारी माणसं कोण असतील, कशी दिसत असतील, काय करत असतील याबद्दल प्रत्येकाच्या काही ठरलेल्या कल्पना असतात. या कल्पना प्रत्येकाच्या स्वतःच्या अनुभवातून तयार झालेल्या असतात, पण तरीही असा खूप व्यायाम करणारा माणूस हार्वर्डसारख्या जगप्रसिद्ध कायदा महाविद्यालयातील एक प्रोफेसर असेल असं पटकन कोणाच्या मनात येणार नाही.

पण खरोखरच हार्वर्ड लॉ कॉलेजमधल्या एका प्राध्यापकाने स्वतःचं 'प्रोफेसर पुलअप्स' हे नाव सार्थ ठरवत एका मिनिटात ७७ पुलअप्स मारत गिनीज बुकमध्ये एका नवीन विश्वविक्रमाची नोंद केलेली आहे. डम सँडल या प्राध्यापकाने हा विश्वविक्रम केला आहे असं म्हणण्यापेक्षा तो परत मिळवला आहे, असं म्हणणं अधिक योग्य ठरेल. कारण मुळात २०१६ साली हा विश्वविक्रम डमच्याच नावावर होता. त्यावेळी त्याने एका मिनिटात ५१ पुलअप्स मारल्या होत्या.

पुलअप्स म्हणजे काय? तर उंचावर असलेल्या आडव्या बारला दोन्ही हातांनी लटकायचं आणि फक्त हाताच्या ताकदीने शरीर वर उचलून हनुवटी त्या बारच्या वर न्यायची. आणि मग परत शरीर हळूच खाली सोडायचं. पाय जमिनीला टेकू न देता हेच पुन्हा करायचं. या व्यायाम प्रकारची गंमत अशी, की यासाठी तुम्हाला अनेक प्रकारचा व्यायाम करावा लागतो; आणि तोही खूप! कारण पुलअप्स मारण्यासाठी हाताचे, खांद्याचे, पोटाचे, पाठीचे, मानेचे स्नायू वापरावे लागतात. स्वतःचं वजन उचलण्याइतपत स्नायू तयार करणं हे अत्यंत कठीण काम असतं. त्यात असे पुलअप्स भराभर मारायचे म्हणजे अजून जास्त ताकद आणि त्यातही चिवटपणा लागणार.

अनेक वर्षे व्यायाम करून शरीर कमावल्यावर डमने २०१६ साली पहिल्यांदा हा विश्वविक्रम स्वतःच्या नावावर केला, पण स्वतःलाच आव्हान देत राहणाऱ्या व्यायामपटूंप्रमाणे त्याने स्वतःचाच विक्रम मोडला, तोही एकदा नाही तर चार वेळा. २०१६ ते २०२० ही वर्षे डम हा पुलअप्सच्या विश्वविक्रमांचा अनभिषिक्त राजा होता. त्याने शेवटचा विक्रम केला तो एका मिनिटात ६८ पुलअप्स मारण्याचा.

मात्र, त्यानंतर २०२० साली चीनच्या हाँग झोंगटाओ या व्यायामपटूने त्याचा विक्रम ६ पुलअप्सने मोडून एका मिनिटात ७४ पुलअप्स मारण्याचा नवीन विश्वविक्रम केला. त्यानंतर मात्र डमने जणू विश्वविक्रम परत मिळवण्याचा ध्यासच घेतला. २०२० सालापासून २०२४ सालापर्यंत त्याने एका मिनिटात ७४ हून जास्त पुलअप्स मारण्यासाठी अथक मेहनत केली, पण हे काम फक्त जास्त मेहनत करून होण्यासारखं नव्हतं. कारण कितीही प्रयत्न केले तरी मानवी शरीराच्या मर्यादा कशा ओलांडणार? त्यात हा विश्वविक्रम करायचा तर प्रत्येक पुलअपचे निकष पूर्ण करणं भाग होतं. हे निकष कोणते? तर बार ओव्हरहँड ग्रीपनेच पकडला पाहिजे, हनुवटी दरवेळी बारच्या वर गेलीच पाहिजे, कोपर पूर्ण सरळ होईल इतकं शरीर खाली आणलं पाहिजे आणि कुठल्याही क्षणी कमरेत वाकलेलं चालणार नाही.

हे सर्व निकष पूर्ण करून एका मिनिटात जास्तीत जास्त पुलअप्स मारण्यासाठी डमकडे एकच मार्ग उरला, तो म्हणजे दोन हातांमध्ये जास्तीत जास्त अंतर घेणं. दोन हातातलं अंतर जर वाढवलं, तर पुलअप्स मारताना शरीर उचलण्याचं अंतर कमी होतं. म्हणजेच कमी वेळात जास्त पुलअप्स मारता येऊ शकतात, पण हा मार्ग चोखाळण्यात एक मोठी अडचणही होती.

कुठल्याही व्यायाम करणाऱ्या व्यक्तीला हे माहिती असतं, की हातात जास्त अंतर घेऊन पुलअप्स मारणं अत्यंत कठीण असतं. कारण त्यामुळे तुमची बारवरची पकड तितकीशी पक्की राहत नाही, पण डमने तरीही तेच करायचं ठरवलं. त्याप्रमाणे व्यायाम केला, ताकद वाढवली आणि २०२४ साली एका मिनिटात ७७ पुलअप्स मारून विश्वविक्रम पुन्हा एकदा स्वतःच्या नावे करून घेतलाच. या प्रवासाबद्दल डम म्हणतो, 'हा विश्वविक्रम सगळ्यात कठीण विक्रमांपैकी एक आहे आणि गेल्या काही वर्षांत यात प्रचंड स्पर्धा वाढलेली आहे. हा विश्वविक्रम करताना शेवटचे १५ सेकंद माझ्यासाठी सगळ्यात कठीण होते.

# जीआयएस चिखली, स्कूलचा शंभर टक्के निकाल



**पिंपरी चिंचवड :** २०२४ चा एस.एस.पी. ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटच्या चिखलीतील जीआयएस स्कूल अँड सिनियर सेकंडरी या शाळेचा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी व बारावीचा सीबीएससी १०० टक्के निकाल जाहीर झाला आहे.

या मध्ये दहावीच्या मनीष वर्मा (९३.६०), ग्रिष्मा पवार (९३ टक्के), शिवदीप तिवारी (९२.२०), श्रेयश देशपांडे (९१.८०), अदिती वेदपाठक (९१.४०), प्रत्युष सकपाळ (९१ टक्के) गुण मिळवले आहेत.

तसेच दहावीच्या २० मुलांना ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. आणि बारावी विज्ञान विभागातून प्राची नेवाळे (७६.४०), बेबी तिवारी (७५.४०), ऋषिकेश नरके (७३ टक्के), अनुष्का कदम (७१.४०), प्रज्ञा मोरे (७० टक्के), वाणिज्य विभागातून नाजिया नदाफ (६४.२०) टक्के गुण मिळाले आहेत. संस्थेचे चेअरमन एस. बी. पाटील साहेब , विश्वस्त गणेश पाटील साहेब , प्रशासकीय अधिकारी प्रकाश गायकवाड, सहयोगी संचालक सुनील शेवाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा गायकवाड, जी आय एस प्ले स्कूल च्या मुख्याध्यापिका भारती गदड, पर्यवेक्षिका मनीषा करंबेलकर, व पर्यवेक्षिका माधुरी येवले व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले.

## नगर, शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणीची तयारी अंतिम टप्प्यात

**अहमदनगर :** येत्या ४ जूनला होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेसाठी अहमदनगर जिल्हा निवडणूक आयोगाने कंबर कसली आहे. नगर एमआयडीसीमधील वखार महामंडळाच्या दोन गोदामात अहमदनगर, शिर्डी लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी होणार आहे. यासाठी ७६८ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

४ जूनला सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरु होणार आहे. नगर आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी ९६ टेबलवर मतमोजणी होणार आहे. असे एकूण १९२ टेबल असणार आहेत. एका विधानसभा मतदारसंघासाठी १६ टेबल असणार आहेत. यामध्ये पोस्टल मतांसाठी दोन टेबल तर ईव्हीएम मतमोजणीसाठी १४ टेबल असणार आहे.

एका टेबलवर ४ कर्मचारी असणार आहेत. यामध्ये पर्यवेक्षक, सहायक, मायक्रो ऑब्झर्व्हर आणि एक शिपाई असे चार कर्मचारी मतमोजणी प्रक्रिया पार पाडणार आहेत. या आठडाभरात कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. निवडणूक विभागाची पूर्वतयारी सुरु झाली आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघात २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते तर शिर्डीत २० उमेदवारांमध्ये लढत होती. दोन्ही मतदारसंघासाठी १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये नगरमध्ये ६६.६१ टक्के म्हणजे १३ लाख २० हजार १६८ मतदान झाले तर शिर्डीसाठी ६३.०३ टक्के म्हणजे १० लाख ५७ हजार २९८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला.

# दिलिपराव माने , अशोकराव टारे यांना शिरोळ भूषण पुरस्कार जाहीर



**शिरोळ :** येथील दलित मित्र डॉ आशोकराव माने सामाजिक प्रतिष्ठान व शिरोळ नगरपरिषद यांच्या वतीने देण्यात येणारा शिरोळ भूषण पुरस्कार रेणूका भक्त मंडळाचे अध्यक्ष दिलीपराव माने आणि उद्योगपती अशोकराव टारे यांना देण्यात येणार असुन आदर्शमाता पुरस्कार माजी खासदार राजू शेट्टी यांच्या मातोश्री रत्नाबाई शेट्टी यांना देण्यात येणार असल्याची माहिती शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब देसाई यांनी दिली . दलित मित्र डॉ अशोकराव माने यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १ जून २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता शिवाजी चौकात शिरोळ भूषण पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे नामदार हसनसो मुश्रीफ यांचे हस्ते व माजी मंत्री आमदार डॉ विनय कोरे यांच्या अध्यक्षतेखाली , संपन्न होणार आहे . या कार्यक्रमास खासदार धैर्यशील माने माजी मंत्री आमदार प्रकाश आवाडे आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, . आमदार अमल महाडिक दत्तचे चेअरमन गणपतराव पाटील, मा खा . राजू शेट्टी , गुरुदत्त चे चेअरमन माधवराव घाटगे मा आ . सुरेश हाळवणकर , माजी आम उल्हास पाटील , , यांचे सह, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत दिलिपराव माने व अशोकराव टारे , मानपत्र व सन्मानचिन्ह , फेटा , शाल , श्रीफळ देऊन गौरवण्यात येणार आहे तसेच यावेळी श्रीमती रत्नाबाई आण्णाप्पा शेट्टी यांचा आदर्शमाता पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे . तसेच उल्लेखनीय कार्य केलेल्या सौ रेखा अमर पाटील - मलीकवाडे यांचाही सत्कार या सोहळ्यात होणार आहे या पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर प्रसिद्ध महिला कीर्तनकार ह भ प रुपालीताई सवणे (परभणी)यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे .

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय खातेदार दलित मित्र डॉ अशोकराव माने माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील , दत्तचे संचालक अनिलराव यादव , पृथ्वीराज यादव , माजी सरपंच शिवाजीराव माने देशमुख , बजरंग काळे , प्रसाद खोबरे , धनंजय टारे , सुहास राजमाने ,सुनील इनामदार बबन बन्ने सागर कोळी यांच्यासह पुरस्कार निवड समितीचे सदस्य व माने सामाजिक प्रतिष्ठानचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते . एक तारखेला जाहिरात मिळणार आहे बातमी सविस्तर वापरणे

## भांडवलदारांच्या भल्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून विकासाचे गाजर दाखवून लोकांची दिशाभूल : बी. युवराज



**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** विकासाच्या नावाखाली जी स्वप्ने विकली जात आहेत, त्यातून खरंच लोकांचा खरा विकास होतोय का? वास्तविक भांडवलदारांच्या भल्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून विकासाचे गाजर दाखवून लोकांची दिशाभूल केली जात आहे, असा आरोप नवसमाजवादी पर्याय संघटनेचे राज्यअध्यक्ष बी. युवराज यांनी केला. पन्हाळा येथे आयोजित कॉम्रेड गोविंद पानसरे युवा जागर शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

कोल्हापुरातील श्रमिक प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हाळा येथे आयोजित तीन दिवसीय निवासी प्रबोधन शिबिराचा समारोप झाला.

या समारोप सत्रात अर्थव्यवस्था व युवक शिक्षण व रोजगार या विषयावर बोलताना बी. युवराज पुढे म्हणाले, विकासाच्या नावाखाली बुलेट ट्रेनसारखे अनेक महाकाय प्रकल्प साकारले जात आहेत. या प्रकल्पाच्या आडून, लोकांच्या गरजेपेक्षा भांडवलदारांच्या गरजेपोटी फसवा विकास केला जात आहे. या प्रकल्पातून कायम रोजगाराची निर्मिती होण्याचे प्रमाण नगण्य आहे. किंबहुना बरेच प्रकल्प हे पांढरे हत्ती ठरत असून, सरकार जनतेपेक्षा भांडवलदारांचे प्रतिनिधी म्हणून काम करत आहे. बेरोजगारी, शिक्षण यासारखे अन्य प्रश्न सोडविण्यासाठी लोकचळवळ उभारण्याची गरज आहे.

दरम्यान, दुपारच्या सत्रात स्मिता वदन यांच्याशी पारलिंगी समूहाचे जगणे समजून घेताना या विषयावर डॉ. मेघा पानसरे यांनी संवाद साधला.

तसेच प्रा. अभय गायकवाड यांनी पन्हाळगडाच्या इतिहासाचा आढावा घेतला. यावेळी प्रा. डॉ. दिलीप चव्हाण, सुशील लाड, कबीर पानसरे, अजित गुरव यांच्यासह शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य सरकार पुणे मनपा निवडणूक घेण्याबाबत गंभीर

## जुलै महिन्याच्या १४ तारखेला सुप्रीम कोर्टामध्ये पुन्हा सुनावणी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राज्य सरकार पुणे मनपा निवडणूक घेण्याबाबत गंभीर आहे. जुलै महिन्याच्या १४ तारखेला सुप्रीम कोर्टामध्ये पुन्हा सुनावणी होणार आहे, अशी माहिती माजी नगरसेवक उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि प्रशांत बधे यांनी आज दिली.

राज्य सरकारच्या आदेशाप्रमाणे नवीन प्रभाग रचना तयार करण्यासंबंधी आम्ही राज्य निवडणूक आयोगाला लोकसभेची निवडणूक सुरू झाल्यानंतर पत्र दिले होते.

पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी देखील निवडणूक अधिकारी म्हणून महेश पाटील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची नेमणूक केली आहे.

सुप्रीम कोर्टाने नवीन प्रभाग रचना करायला मनाई दिलेली नाही. सुप्रीम कोर्टाच्या रिटपिटिशन मध्ये रिव्यू पिटीशनमध्ये ऑर्डर स्पष्ट आहे २२ मार्च २०२२ रोजी जी प्रभाग रचना आहे त्यावर त्वरित निवडणूक प्रक्रिया सुरू करा. मध्यंतरी सत्ता बदल झाल्यानंतर राज्य सरकारने मंत्रिमंडळामध्ये ठराव करून ींक्षिशलींशव ीींश्रिरींळेप न पकडता कायद्याला अभिप्रेत असणारी लगतच्या जनगणनेची लोकसंख्या गृहीत धरायची असे ठरवले.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा समावेश होऊ शकतो. त्याचा विचार करून आज पुणे महानगरपालिकेचे लोकसंख्या ३५ लाख ५६ हजार इतकी झाली आहे. मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम यातील कलमाच्या तरतुदीनुसार ३० लाख लोकसंख्येला १६१ लोकप्रतिनिधी तर त्यापुढील प्रत्येक १ लाख लोकसंख्येला १ लोकप्रतिनिधी याचा विचार केला तर पुण्याच्या लोकप्रतिनिधींची संख्या १६८ इतकी होईल.

पुणे कॅन्टोन्मेंट व खडकी कॅन्टोन्मेंट पुणे महानगरपालिकेत समाविष्ट केल्यास त्यांची लोकसंख्या अंदाजे ७० लाख अधिक ७५ लाख म्हणजे दीड लाख आहे आणि प्रभाग रचना करण्या अगोदर जर जनगणना झाली तर पुण्याची लोकसंख्या किमान ४६ लाख ते ४७ लाख होईल. त्याचा विचार केल्यास त्यात १७८ ते १८० नगरसेवक होतील. आता नव्याने जनगणना न होता निवडणूक झाली तर १० सदस्य कमी होतील.

महाराष्ट्रातील निवडणुकीचा अंतिम टप्पा २० तारखेला संध्याकाळी सहा वाजता संपणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या परवानगीने प्रभाग रचना तयार करण्याचे काम सुरू करणे आवश्यक आहे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार प्रभाग रचना तयार करणे आवश्यक व गरजेचे आहे.

एक प्रारूप प्रभाग रचना कशी होऊ शकते याचं मॉडेल १ जून २०२४ रोजी आम्ही पुणेकरांना सादर करणार आहोत.

मार्गदर्शक तत्व महानगरपालिकेची प्रचलित वार्ड ऑफिसेसची रचना याचा विचार करून समाविष्ट २३ गावातील लोकप्रतिनिधींना नेतृत्वाची संधी देता येईल त्या गावात राहणाऱ्या लोकांना आपल्या विभागाच्या विकासाची दिशा ठरवता आली पाहिजे अशा प्रकारे ही प्रभाग रचना असावी, असा आमचा प्रयत्न राहील. २००२ साली महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांसाठीचे प्रभाग वेगळे केले होते. त्याचा परिणाम आणि फायदा असा झाला की त्या त्या समाविष्ट गावातील नागरिकांचे प्रतिनिधित्व करणारे त्याच गावातील लोकप्रतिनिधी निवडून आले आणि अतिशय चांगल्या पद्धतीने त्या भागांचा विकास झाला. उदा. खराडी असेल बाणेर बालेवाडी असेल बावधन असेल वारजे असेल या परिसराचा उदाहरणार्थ उल्लेख करतो कारण या भागामध्ये सुनियोजित विकास सुरू आहे झालेला आहे हेच मॉडेल आत्ता समाविष्ट होणाऱ्या २३ गावांच्या मध्ये करता येईल का याचाही आम्ही गंभीरपणे विचार करणार आहोत यासाठी या समाविष्ट गावांतील जुन्या लोकप्रतिनिधी आणि नागरिकांशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संवाद साधण्याचे देखील आम्ही ठरवले आहे, असेही या नगरसेवकांनी म्हटले आहे.

## डॉ. राजेंद्र रामचंद्र रसाळ यांना पी.एच.डी पदवी गोवा येथे प्रदान....

**पणजी :** वाई येथील पाटबंधारे विभागात कार्यरत असणारे अभियंता राजेंद्र रामचंद्र रसाळ यांना गोवा येथे ईस्टोनिया देशाच्या


ईरो एशियन विद्यापीठाच्यावतीने इंजिनीयरिंग सर्व्हिसेस या विषयावर पी.एच. डी.पदवी प्रदान करण्यात आली. गोवा राज्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. त्यांनी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस या विषयावर प्रबंध सादर केला होता.

वाई येथील सह्याद्रीनगर येथे राहणारे डॉ .राजेंद्र रसाळ हे अभियंता आहेत. त्यांनी गरवारे कंपनीत दहा वर्षे सेवा बजावली आहे. त्यानंतर ते महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागात कार्यरत झाले. पाटबंधारे विभागात त्यांनी सातारा आणि सांगली जिल्ह्यातील अनेक धरणाच्या कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता.

# नृत्ययात्री प्रस्तुत 'अग्रे पश्यामी' नृत्य नाट्य २५ मे रोजी पुण्यात

## ६ भाषा,१० संगीतकार,४० रागमाला,४० नृत्यकलाकारांचा सहभाग

**पुणे :** चेन्नईच्या ४० पेक्षा जास्त नृत्यकलाकारांचा समावेश असलेले 'अग्रे पश्यामी' हे नृत्यनाट्य पुण्यात प्रथमच 'नृत्ययात्री' संस्थेतर्फे आयोजित करण्यात येत आहे. दि.२५ मे रोजी संध्याकाळी ६:३० वाजता अण्णा भाऊ साठे सभागृह(पद्मावती) येथे हे नृत्यनाट्य सादर होणार आहे.



श्रीविष्णूच्या कूर्म,वराह,नृसिंह,राम आणि कृष्ण या अवतारांचं वर्णन भरतनाट्यम,मोहिनीअट्टम, कुचीपुडी आणि कृष्णाट्टम कली या नृत्यशैलींच्या माध्यमातून या नृत्य नाट्यात साकारलं जाणार आहे.संस्कृत,तमिळ,मल्याळी,कानडी, तेलगू आणि मराठी अशा ६ भाषेतील निवडक रचनांना १० प्रतिभावान संगीतकारांनी दिलेलं ४० वेगवेगळ्या रागमालांमधील संगीत,अतिशय सुंदर रंगभूषा,वेशभूषा ही नृत्य रसिकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे.'नृत्ययात्री'च्या संस्थापक मेघना साबडे यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

या निमित्ताने शास्त्रीय नृत्याच्या इतिहासात प्रथमच 'नारायणीयम' हे नृत्य नाट्याच्या स्वरूपात सादर होणार आहे.'नारायणीयम' नावाच्या संस्कृत काव्यावर हे नृत्यनाट्य आधारित आहे.सुमधुर अशा संस्कृत काव्यरचनांसाठी ओळखले जाणारे नारायण भट्टातीरी नावाचे एक प्रतिभावान कवी केरळमध्ये सोळाव्या शतकात होऊन गेले.

त्यांनी भागवत पुराण संक्षिप्त स्वरूपात आणून एकूण दहा दहा श्लोकांच्या शंभर दशकांमध्ये त्याची केलेली काव्यरचना म्हणजेच 'नारायणीयम' हे काव्य आहे. विलक्षण साहित्यिक गुणवत्ता असलेलं हे काव्य भक्तीरसाने ओथंबलेलं आहे.संस्कृत साहित्यात उच्च स्थान असलेलं हे काव्य केरळ आणि तमिळनाडू मधील एक लोकप्रिय धार्मिक ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे.या काव्याचे पठण केल्यास उत्तम आरोग्य आणि सुख समृद्धी लाभते अशी भक्तांची श्रद्धा आहे.

प्रसिद्ध वक्ते,प्राचीन वैदिक ग्रंथांचे लेखक, संशोधक आणि दिग्दर्शक श्री दुष्यंत श्रीधर यांनी या नृत्यनाट्याची संहिता तयार केली आहे.भरतनाट्यम नृत्य शैलीतील प्रसिद्ध गुरु श्रीमती अनिता गुहा यांची नृत्यसंरचना आहे.संगीत नाटक अकादमी पुरस्कारप्राप्त डॉ. राजकुमार भारती यांची संगीतरचना आहे. साऊंडस्केप डिझाइन श्री साई श्रवणमचे आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# सांगलीची सिंचन मागणी कमी ; कोयना धरणातील विसर्ग घटला

**सातारा :** सांगली पाटबंधारे विभागाकडून सिंचनाची मागणी कमी झाल्याने कोयनेतून पाणी विसर्ग कमी करण्यात आला आहे. सध्या विमोचक द्वार आणि पायथा वीज गृहातून एकूण २६०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत आहे. धरणात सध्या २५.८१ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. १ जूनपासून नवीन तांत्रिक वर्ष सुरू होणार आहे.

जिल्ह्यात गेल्यावर्षी अपुरे पर्जन्यमान झाल्याने दुष्काळी स्थिती उद्भवली आहे. त्यामुळे गेल्यावर्षीपासूनच कोयनेसह उरमोडी, कण्हेर आदी धरणांतून सतत पाण्याची मागणी होत होती. तर कोयनेतून सांगली जिल्ह्यासाठी मागील पाच



महिन्यांपासून पाणी सोडले जात आहे. पण सांगली पाटबंधारे विभागाकडून सिंचनासाठी मागणी कमी झाली. त्यामुळे सोमवारी सकाळी ११ पासून सांगलीसाठी विसर्ग कमी करण्यात आला आहे.

धरणाच्या विमोचक द्वारामधून १ हजार क्युसेक विसर्ग केला जात होता. तो ५०० क्युसेकने कमी झाला आहे. सध्या कोयना धरणाच्या पायथा वीज गृहाचे दोन्ही युनिट सुरू आहेत.

त्यामधून २१०० आणि विमोचक द्वार ५००, असे २६०० क्युसेक पाणी सांगलीसाठी सोडले जात आहे. हे सर्व पाणी कोयना नदीतून सांगलीसाठी जात आहे. तर धरणातील पाणी तरतुदीचे तांत्रिक वर्ष ३१ मे रोजी संपत आहे. १ जूनपासून नवीन वर्ष सुरू होणार आहे. सध्या धरणात २५.८१ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. टक्केवारीत हे प्रमाण २४.५२ इतके आहे.

# शिंदेंसोबत गेलो पण एकटा पडलो गजानन कीर्तीकर यांची खंत

**मुंबई :** शिवसेनेत फूट पडल्यानंतर माजी खासदार गजानन कीर्तीकर यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलो. पत्नीसह दोन्ही मुली आणि अमोल किर्तीकर यांचा या निर्णयाला विरोध होता. परंतु, काही वेगळ्या कारणामुळे हा निर्णय घेतला. मात्र एकनाथ शिंदेंसोबत गेलो, आणि अजित पवारांसारखा एकटा पडलो, असे शिवसेना नेते गजानन कीर्तिकर यांनी मनातील खंत व्यक्त केली. कीर्तीकर यांनी पत्नीसोबत मतदानाचा हक्क बजावल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही खंत बोलून दाखवली.

एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर सेनेच्या ४० आमदार, १३ खासदारानीं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र



केला. वरिष्ठ नेते गजानन किर्तीकर यांचाही समावेश होता. लोकसभेच्या पाचव्या टप्प्यात मुंबईत मतदान प्रक्रिया पार पडली. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभेत शिवसेनेच्या (ठाकरे) अमोल किर्तीकर यांच्या विरोधात शिवसेनेचे रविंद्र वायकर रिंगणात आहेत. गजानन कीर्तिकर यांच्या नावाला पक्षांतर्गत विरोध झाल्याने अखेरच्या क्षणी वायकर यांना उमेदवारी जाहीर केली. सोमवारी (ता.२०) मतदान प्रक्रिया पार पडली. माजी खासदार गजानन कीर्तिकर यांनी पत्नीसह मतदानाचा हक्क बजावला.

कीर्तिकर यांच्या पत्नी मेघना यांनी मतदान केल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, कीर्तीकर यांनी पक्षप्रमुख (ठाकरे) उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या सोबत जाऊ नये, असे अनेकदा बजावले.

आम्हाला ते आवडले देखील नाही. त्यामुळे वरिष्ठ नेते असताना एकनाथ शिंदे यांना सलाम ठोकणार का, असा सवाल केला होता. प्रत्येकाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यानुसार त्यांनी तो घेतला. मात्र मी माझ्या मुलाच्या अमोल किर्तीकर यांच्या पाठीमागे ठाम उभी आहे. तो मोठा मताधिक्याने निवडून येईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

# बेवारस ट्रॅव्हल बॅगमध्ये सापडला कुजलेला मृतदेह

**शिराळा :** शिराळा येथील बाह्य वळण रस्त्यावरील सुरले पाटील वस्ती जवळील पुलाखाली बेवारस ट्रॅव्हल बॅगेमध्ये ठेवलेला मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे.हा मृतदेह पुरुष की स्त्री याबाबत अद्याप समजू शकले नाही. ही घटना आज सोमवार दि.२० रोजी सकाळी ९:३० च्या दरम्यान समजली. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र समजल्यावर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. हा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने घटनास्थळी शवविच्छेदन करण्यात आले. घटनास्थळी शिराळा पोलिसांनी लगेच धाव घेतली.याठिकाणी श्वान पथक व ठसे तज्ञांना बोलवण्यात आले होते.हा खून पंधरा दिवसांपूर्वी झाला असल्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

याबाबत पोलीस ठाण्यातून मिळालेली माहिती अशी की , या परिसरात दुर्गंधी येत असल्याचे फोन वरून कळविण्यात त्यावरून पोलीस ठाण्यात कळविण्यात आले.यावेळी तातडीने पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम , सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिता मेनकर यांच्यासह सुभाष पाटील, संदीप पाटील, सुनील पेटकर, नितीन यादव ,अमोल साठे, सुनील पाटोळे, महेश गायकवाड ,संदीप भानुसे, रजनी जाधव, अमर जाधव यांनी धाव घेतली. याठिकाणी पाहणी केली असता एका बॅगेमध्ये सतरंजीमध्ये गुंडाळलेला पूर्ण कुजलेल्या अवस्थेत गळ्याभोवती व शरीरास नायलॉनच्या दोरीने बांधल्याचे आढळून आले.

त्या मृतदेहाची कवटी , हाडे शिल्लक होती. याबाबत तातडीने श्वान पथक व ठसे तज्ञांना पाचारण करण्यात आले. तसेच मृतदेह पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेत असल्याने घटनास्थळी डॉ.जुबेर मोमीन , डॉ.अनिरुद्ध काकडे , डॉ योगिता माने शवविच्छेदन केले. कोल्हापूर परिक्षेत्र अधिकारी सुनील फुलारी , जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक ऋतू खोखर , विभागीय पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत सूचना दिल्या.

# जिल्ह्यात दुष्काळामुळे भीषण स्थिती, नागरिकांची पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती

**सातारा :** जिल्ह्यात दुष्काळामुळे भीषण स्थिती निर्माण झाली असून, सव्वा तीन लाख लोकांची पाण्यासाठी तडफड सुरू आहे. त्यामुळे घोटभर पाण्यासाठीही दाहीदिशा भटकंती सुरू आहे. तसेच चारा आणि पाणीही वेळेत मिळत नसल्याने दोन लाख जनावरांचा हंबरडा सुरू आहे. माळरानेही काळवंडली आहेत. त्यामुळे चाऱ्याच्या शोधात शेतकरीही भटकू लागलाय.

जिल्ह्यात दर चार - पाच वर्षांनी दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. २०१८ साली जिल्ह्यात दुष्काळाचे भीषण संकट होते. त्यावेळी अनेक गावांत जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्यात आल्या होत्या. त्यामुळे हजारो पशुधन छावण्यात होते. त्याचठिकाणी शेतकऱ्यांनीही संसार थाटलेला. त्यानंतर आता दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे.

मागील वर्षी जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या ६५ टक्के पाऊस पडला. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात पाऊस कमी



राहिला. त्यामुळे गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यापासूनच दुष्काळी परिस्थिती आहे. राज्य शासनाने वाई, खंडाळा या संपूर्ण तालुक्याबरोबरच इतर ६०हून अधिक महसूल मंडळात दुष्काळ जाहीर केला आहे. पण, दुष्काळाच्या सवलती किती प्रमाणात लागू झाल्या याविषयी आजही शेतकऱ्यांना प्रश्न पडला आहे. सध्या तर जिल्ह्यात पाणी आणि चाऱ्याचा मोठा गहन प्रश्न आहे. त्यात दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे.

जिल्ह्यातील माण आणि खटाव तालुक्यात दुष्काळाची दाहकता अधिक आहे. माणमध्ये १०५ गावे आहेत. त्यातील ७१ गावे आणि ४३७ वाड्यावस्त्यांवर टंचाईच्या झळा आहेत. या गावातील १ लाख २४ हजार ६२३ लोकांना टँकरच्या पाण्याचा आधार आहे. १ लाख १९ हजार ७१५ पशुधनही टँकरवर अवलंबून आहे. माण तालुक्यात सध्या ८५ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. खटाव तालुक्यातही टंचाईची भीषणता वाढली आहे. ५२ गावे आणि १४५ वाडीवस्त्यांवर टँकरची चाके फिरू लागली आहेत. ३९ टँकरने ८१ हजार ३८४ नागरिकांना आणि १९ हजार ६४२ जनावरांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. फलटण तालुक्यातही दुष्काळाची चिंता आहे. सध्या ४० गावे आणि ९९ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. या टँकरवर सुमारे ६४ हजार नागरिक आणि ३७ हजारांवर पशुधनाची तहान अवलंबून आहे.

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागात टंचाईच्या झळा वाढल्या आहेत. या भागातील ३३ गावात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तालुक्यात सध्या २६ टँकरने ४२ हजार नागरिक आणि २४ हजार ६५६ जनावरांना पाणी देण्यात येत आहे. खंडाळा तालुक्यातील दोन गावांत टंचाई आहे. त्यासाठी एक टँकर सुरू असून, १ हजार ३३० नागरिक आणि १५९ पशुधनाला आधार मिळाला आहे. वाई तालुक्यात ६ गावे आणि ५ वाड्यांना, तर पाटणमधील २ गावे तसेच ८ वाड्यांसाठी टँकर सुरू आहे. कऱ्हाड तालुक्यातही ७ गावांतील ५ हजार नागरिक आणि ३ हजार जनावरांना ४ टँकरने पाणीपुरवठा होत आहे.

**२१३ गावे अन् ६९४ वाड्यांसाठी १९९ टँकरचा धुरळा**

जिल्ह्यात २०१८ प्रमाणचे टंचाईची स्थिती निर्माण झाली असून, सध्या २१३ गावे आणि ६९४ वाडीवस्त्यांत टंचाईची झळ पोहोचली आहे. एकूण ३ लाख २७ हजार ५५६ नागरिक आणि २ लाख १० हजार २०२ पशुधनाला १९९ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. माण तालुका ७५ टक्के टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यातच जिल्ह्यातील अनेक गावांतून टँकरला मागणी होत आहे. त्यामुळे लवकरच आणखी टंचाईग्रस्त गावांची आणि टँकरची संख्याही वाढणार आहे.

**६१ विहिरी अन् ५० बोअरवेल अधिग्रहण**

जिल्ह्यात टंचाईच्या गावांत टँकरने पाणीपुरवठा होत आहे. त्याचबरोबर लोकांना जवळ पाणी उपलब्ध व्हावे म्हणून विहिरी आणि बोअरवेलचे अधिग्रहण करण्यात आले आहे. सध्या ६१ विहिरी आणि ५० बोअरवेलचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यातूनही लोकांना पाणीपुरवठा केला जात आहे.

# पोलीस पाटलांचे रिक्त पदे तातडीने भरण्याची राम इढोळे यांची मागणी

**वाशीम :** वाशिम : तालुक्यातील बऱ्याच गावांत पोलीस पाटलांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे या गावातील लोकांना दुसऱ्या गावातील प्रभारी पोलिस पाटीलांकडे दाखले घेण्यासाठी जावे लागते. काही पोलीस पाटलांकडे तीन ते चार गावांचा प्रभार असल्यामुळे पोलीस पाटील व नागरीक त्रस्त आहेत. ही समस्या पाहता वाशिम तालुक्यासह जिल्ह्यातील रिक्त पोलीस पाटलांची पदे तातडीने भरण्याची मागणी राम इढोळे साभिमानि शेतकरी संघटना विदर्भ सचिव यांनी केली आहे. वाशिम तालुक्यातील आडोळी, अटकळी, टो, केकतउमरा, वाघोली बु., एकबुर्जी, येवती, मोहजा रोड, गणेशपूर,



आडगाव, बोरखेडी गावांसह जिल्ह्यातील बऱ्याच गावांतील पोलीस पाटलांची पदे कित्येक वर्षांपासून रिक्त आहेत. त्यामुळे संबंधित गावचा प्रभार दुसऱ्या गावातील पोलीस पाटलांकडे देण्यात आला आहे. काही पोलीस पाटलांकडे तर तीन ते चार गावांचा प्रभार देण्यात आल्यामुळे पोलीस पाटील यांच्यावरील कामाचा ताण वाढला आहे. तर विविध कामानिमित्त लागणारे दाखले घेण्यासाठी येणाऱ्या नागरीकांना पोलीस पाटील वेळीस भेटत नसल्यामुळे नागरीक देखील त्रस्त झाले आहेत.

ग्रामीण भागातील नागरीकांची ही समस्या पाहता महसूल विभाग व पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून पोलीस पाटलांच्या रिक्त तातडीने जागा भराव्यात, अशी मागणी राम इढोळे साभिमानि शेतकरी संघटना विदर्भ सचिव यांनी केली आहे. पोलीस पाटील हे नागरिक व पोलीस प्रशासनातील दुवा पोलीस पाटील हे ग्रामीण भागात कायदा सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने फार मोलाचे कार्य करतात. त्यामुळे नागरीक व पोलीस प्रशासन यांच्यातील ते एक दुवा म्हणून कार्यरत असतात.

मात्र, वाशिम तालुकाच नव्हे तर जिल्ह्यात अनेक गावांतील पोलीस पाटील पदे रिक्त आहेत. त्यामुळे जिल्हा पोलीस प्रशासनाने पोलीस पाटलांच्या रिक्त जागांचा आढावा घेऊन नागरीकांच्या सोयीसाठी ही पदे तातडीने भरण्याची मागणी राम इढोळे साभिमानि शेतकरी संघटना विदर्भ सचिव यांनी केली आहे.

# आंबा महोत्सवात दोन दिवसांत १४ लाखांची उलाढाल, कोल्हापूकरांनी चार हजार डझन आंबे केले फस्त

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने कोल्हापूर शहरात सुरू असलेल्या आंबा महोत्सवाला कमालीचा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या दोन दिवसांत कोल्हापूकरांनी तब्बल ४ हजार डझन आंबे फस्त केले असून १४ लाखांची उलाढाल झाली आहे. 'देवगड' हापूसला सर्वाधिक पसंती राहिली आहे.

पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते, यंदा



लोकसभा निवडणुकीमुळे महोत्सवाला थोडा उशीर झाल्याने प्रतिसाद कसा मिळतो? याबाबत साशंकता होती. मात्र, महोत्सवातील आंब्यांचे प्रकार व खात्रीमुळे कोल्हापूरकरांच्या आंबा खरेदीसाठी अक्षरशः उड्या पडत आहेत.

या महोत्सवात रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, सोलापूरसह कोल्हापुरातील २८ शेतकरी सहभागी झाले आहेत. 'रत्नागिरी हापूस'सह विविध वाणांचे आंबे उपलब्ध असले तरी तुलनेत देवगड हापूसला मागणी अधिक आहे. आतापर्यंत ५०० डझन देवगड आंब्याची विक्री झाली आहे.

# सट्टा प्रकरणी नव्याने मुख्य तीन आरोपींना पकडण्यात यश

**नारायणगाव :-** नारायणगाव येथे सुरू असलेल्या महादेव प तसेच लोटस ३६५ या ऑनलाइन सट्टा प्रकरणी नव्याने मुख्य तीन आरोपींना पकडण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांना यश आले असून या आरोपींना आज जुन्नर येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे

या घटनेतील मुख्य सूत्रधार व फरार झालेले आरोपी राज ललित बोकरिया (वय २९, रा. शांतीनगर, जुन्नर) ऋत्विक सुरेश कोठारी (वय २४, रा. वारूळवाडी,ता. जुन्नर ) मोहम्मद सलमान पठाण (वय ३२, रा. नंदनवन सोसायटी, नारायणगाव) यांना मध्य प्रदेश येथून अटक करण्यात आली

या घटनेत एकूण ९६ आरोपी निष्पन्न झाले असून या गुन्ह्यामध्ये तीन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.

दरम्यान यापूर्वी ८८ आरोपींची रवानगी येरवडा येथील जेलमध्ये करण्यात आली असून त्यापैकी तेरा जणांना पुढील चौकशीसाठी पुन्हा बोलवण्यात येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी आज नारायणगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली

हे आरोपी शहागड जिल्हा सागर मध्य प्रदेश येथे तीन दिवसाच्या पथक परिश्रमानंतर ताब्यात घेण्यात आले

# देशभरात तब्बल २३०० कोटींचे मोलॅसिस, इथेनॉल शिल्लक

## 'बी हेवी'चे निर्बंध हटवले, हंगामात साखर उत्पादन वाढले

**कोल्हापूर :** देशातील साखरेच्या उत्पादनाचा अंदाज आल्याने 'बी हेवी' मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली खरी, पण बंदी असतानाही ज्यांनी तयार करून ठेवले त्यांनाच फायदा होणार आहे. राज्यात ११०० कोटी तर देशात २३०० कोटींचे मोलॅसिस व इथेनॉल शिल्लक आहे. तेल कंपन्यांनी सुमारे ६७ कोटी लिटर खरेदीची निविदा काढली असली, तरी कोटा वाढविण्याची मागणी कारखान्यांकडून होत आहे.

डिसेंबर २०२३ मध्ये केंद्र शासनाने घेतलेल्या आढाव्यामध्ये देशातील साखरेची उपलब्धता कमी राहण्याचा आणि त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर स्थानिक बाजारातील साखरेच्या दरात वाढीच्या भीतीपोटी केंद्र सरकारने ७ डिसेंबर २०२३ रोजी उसाचा रस, साखरेचा अर्क तसेच बी हेवी मळीपासून



इथेनॉल निर्मितीस बंदी आणली. कारखान्यांमध्ये तयार असलेले इथेनॉल, इथेनॉलसाठी लागणारे बी हेवी मळीचे साठे तसेच तेल कंपन्यांशी केलेले करार या सगळ्यांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. केंद्र सरकारने १५ डिसेंबर २०२३ रोजी सुधारित आदेश काढून शिल्लक इथेनॉल आणि काही प्रमाणात बी हेवी मळी याची इथेनॉल वापरासाठी परवानगी देऊन कारखान्यांना अंशतः दिलासा दिला. जास्तीत जास्त १७ लाख टन साखर इथेनॉल निर्मितीकडे वळविण्याची परवानगी देण्यात आली.

हंगामात अपेक्षेपेक्षा २० ते २५ लाख टनाने साखर उत्पादन वाढल्याने शिल्लक राहिलेल्या सुमारे सात लाख टन बी हेवी मळीचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करण्याची मागणी राष्ट्रीय साखर महासंघाने केंद्र सरकारकडे केली. त्यानंतर २४ एप्रिल रोजी केंद्र शासनाकडून सुमारे ७ लाख टन शिल्लक बी हेवी मळीचा वापर इथेनॉलकडे करण्याची परवानगी दिली. यामधून सुमारे ३.२५ लाख टन अतिरिक्त साखर इथेनॉल निर्मितीकडे वळवली गेल्याने त्यातून ३८ कोटी लिटर इथेनॉल निर्मिती होईल. ज्याची किंमत २३०० कोटी आहे. या निर्णयामुळे साखरेचे साठे कमी होण्यात व स्थानिक साखरेचे विक्री दर सुधारण्यात मदत होणार आहे.

**'बी हेवी' इथेनॉल साठविणे जोखमीचे**

'बी हेवी'पासून तयार केलेले इथेनॉल टँकमध्ये साठवून ठेवणे जोखमीचे असते. त्यात वाढत्या तापमानामुळे अधिक धोका असतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

**२० लाख टन साखर निर्यातीची मागणी**

देशातील साखर उत्पादन आणि बफर स्टॉक करून शिल्लक राहणाऱ्यापैकी किमान २० लाख टन निर्यात करण्यास परवानगी मिळावी, अशी मागणी साखर कारखानदारांनी केंद्र सरकारकडे केली आहे. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचा दर चांगला आहे.

**मक्यापासून मोठ्या प्रमाणात इथेनॉल निर्मिती**

मध्यंतरी साखर कारखान्यांवर इथेनॉल निर्मितीला निर्बंध घातल्यानंतर केंद्र सरकारने मक्यापासून मोठ्या प्रमाणात इथेनॉल निर्मिती केली. त्याचा फटकाही आता बसू शकतो.

## क्राईम

### नारायणगाव येथे सुरू असलेल्या सट्टा प्रकरणी नव्याने मुख्य तीन आरोपींना पकडण्यात यश

**नारायणगाव :** नारायणगाव येथे सुरू असलेल्या महादेव प तसेच लोटस ३६५ या ऑनलाइन सट्टा प्रकरणी नव्याने मुख्य तीन आरोपींना पकडण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांना यश आले असून या आरोपींना आज जुन्नर येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे

या घटनेतील मुख्य सूत्रधार व फरार झालेले आरोपी राज ललित बोकरिया (वय २९, रा. शांतीनगर, जुन्नर) ऋत्विक सुरेश कोठारी (वय २४, रा. वारूळवाडी,ता. जुन्नर ) मोहम्मद सलमान पठाण (वय ३२, रा. नंदनवन सोसायटी, नारायणगाव) यांना मध्य प्रदेश येथून अटक करण्यात आली

या घटनेत एकूण ९६ आरोपी निष्पन्न झाले असून या गुन्ह्यामध्ये तीन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.

दरम्यान यापूर्वी ८८ आरोपींची रवानगी येरवडा येथील जेलमध्ये करण्यात आली असून त्यापैकी तेरा जणांना पुढील चौकशीसाठी पुन्हा बोलवण्यात येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी आज नारायणगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

हे आरोपी शहागड जिल्हा सागर मध्य प्रदेश येथे तीन दिवसाच्या पथक परिश्रमानंतर ताब्यात घेण्यात आले.

### एटीएम जिलेटीनने फोडण्याच्या तयारीत असणारी पाचजणांची टोळी जेरबंद

**सातारा :** उंब्रज व तळबीड पोलिसांनी मसूर (ता. कराड) येथील एटीएम जिलेटीनने फोडण्याच्या तयारीत असणाऱ्या पाच जणांच्या टोळीला शिवडे (ता. कराड) गावच्या हद्दीत कृष्णा नदीच्या पुलानजीक सापळा रचून पकडले. या टोळीमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे.


वैभव राजेंद्र साळुंखे (वय ३३), ओमकार बाळासाहेब साळुंखे (वय २३), आदित्य संतोष जाधव (वय १९, सर्व रा. मोळाचा ओढा, सातारा) व एक अल्पवयीन असून अन्य एक जण पळून गेला आहे.

याबाबत उंब्रज पोलिसांनी दिलेली माहिती अशी, गुरुवारी रात्री तळबीड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किरण भोसले हे रात्रगस्तसाठी जाताना शिवडे गावच्या हद्दीत कृष्णा नदीच्या पुलाजवळ पाचजण संशयितपणे आढळून आले.

यावेळी उंब्रज पोलीस व तळबीड पोलिसांनी संशयितांना घेराव घातला असता त्यातील एकजण अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. यावेळी पोलिसांनी संशयितांची झडती घेतली असता संशयितांकडून तीन कटावणी, चार जिलेटीन कांड्या, डेटोनेटर, बॅटरी, दोन एक्सा ब्लेड, करवत, कोयता ब्लास्टींग वायर, दोन मोटरसायकल व चेहऱ्याचे मास्क असा एकूण १ लाख ३७ हजार ९८० रुपये किंमतीचे साहित्य हस्तगत केले.

पोलिसांनी संशयितांकडे अधिक चौकशी केली असता, संशयितांनी आठ दिवसांपासून मसूर येथील हिताची कंपनीचे एटीएम सेंटर जिलेटीनने उडवून टाकण्याचे नियोजन केले असल्याचे सांगितले. तसेच सदर जागेची व एटीएमची चार दिवसांपूर्वी रेकी केली होती. त्यानुसार दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना तळबीड व उंब्रज पोलिसांनी संयुक्त कारवाई करून संशयित दरोडेखोरांना ताब्यात घेतले. यावेळी तळबीड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किरण भोसले, पोलिस हवालदार निलेश विभुते, पाटील यांच्यासह उंब्रज पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र भोरे, पोलिस हवालदार धुमाळ, साळे, माने यांनी कारवाई केली. अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक रविंद्र भोरे करीत आहेत.

### निंबळकमध्ये भरवस्तीत बिबट्या घुसला; ग्रामस्थांमध्ये घबराट



**सातारा :** गेली काही वर्षे निंबळक व परिसरातील शेतीमध्ये वास्तव्यास असलेला बिबट्या शनिवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास निंबळक गावात भरवस्तीत घुसरल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गेल्या काही वर्षांपासून निंबळक आणि टाकळवाडे गावच्या परिसरात बिबट्याचा वावर होता. या परिसरात वनविभागाने बसवलेल्या कॅमेऱ्यांमध्ये बिबट्याचे छायाचित्र कैद झाल्यानंतर वनविभागाने बसवलेल्या पिंजऱ्याला सुध्दा बिबट्याने हुलकावणी दिली. शेवटी वनविभागसुध्दा बिबट्याला पकडण्यात अपयशी झाले. त्यानंतर काही दिवस बिबट्या येथील ग्रामस्थांना अनेकवेळा दिसला. या काळात अनेक शेतकरी, मजूर यांच्या शेळ्या, बोकड, लहान वासरे, कुत्री बिबट्याकडून फस्त केली जात होती. वनविभाग पंचनामा करून नुकसानभरपाई सुध्दा देत होते; परंतु बिबट्या काही वनविभागाला सापडत नव्हता. गेल्या महिन्यात तर बिबट्याने कहरच केला, त्याने दीडशे किलोचा घोडाच मारला व फस्त केला; परंतु या घटनेने ग्रामस्थांमध्ये भीती वाढवली. त्या घोडेवाल्याचा घोडा त्याच्या डोळ्यांसमोर एक नव्हे तर तीन बिबट्यांनी मारून घेऊन जाताना त्या इसमास फक्त पाहत बसण्याची वेळ त्याच्यावर आली. या घटनेमुळे निंबळक व टाकळवाडे परिसरातील ग्रामस्थांमध्ये आणखीनच घबराट पसरली.

दरम्यान, हा बिबट्या अनेक दिवस शेतात, वस्तीवर वास्तव्यास होता; परंतु शनिवारी रात्री त्याने कहरच केला. या बिबट्याने निंबळक गावठाणमध्येच प्रवेश केला. भला मोठा बिबट्या गावात घुसल्याने ग्रामस्थांमध्ये या बिबट्याची मोठी दहशतच निर्माण झाली आहे.

# पाण्यासाठी महिलांचा पालिकेत ठिय्या

## मुख्याधिकीऱ्यांनी दिले लेखी आश्वासन

**म्हसवड :** म्हसवड शहरात सध्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर बनला असुन १५ दिवसांतुन एकवेळ पालिकेकडुन शहराला पाणी पुरवठा केला जात असल्याने शहरवासियांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरु झाली आहे, यावर प्रशासनाला जाब विचारण्यासाठी येथील नाभिक गल्लीतील महिलांनी एकत्र येत थेट पालिकेत धडक मारत त्याठिकाणी ठिय्या मांडल्याने प्रशासनाची भंबेरी उडाली जोवर पाणी मिळणार नाही तोवर याठिकाणुन न उठण्याचा निर्धार व्यक्त केल्याने अखेर मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांनी आजपासुन सुरळीत पाणी देत असल्याचे लेखी आश्वासन संबधित महिलांना दिल्यावर महिलांनी आपले ठिय्या आंदोलन मागे घेतले.



म्हसवड शहराला पालिकेकडुन होणार्या पाणी पुरवठ्यामध्ये सध्या कमालीचा विस्कळीतपणा आला असल्याने शहराला पिण्याचे पाणी १५ दिवसांतुन एकवेळ असा आता होवु लागला आहे, त्यामुळे नागरीकांकडुन तीव्र संताप व्यक्त होत आहे. शहराच्या विस्कळीत पाणी पुरवठ्याला पालिका प्रशासनच जबाबदार असुन नागरीकांची पाण्यासाठी भटकंतीही याच प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे सुरु असल्याचा आरोप सामान्य म्हसवडकर जनतेतुन केला जात आहे. तर सध्या पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांना पाण्याचे टँकर विकत घ्यावे लागत असल्याने नागरीकांना अकारण आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, तर शहर परिसरातील पाण्याचे स्तोत्र ही आटु लागल्याने पाण्याच्या टँकरचेही दर दररोज वाढु लागले आहेत, त्यामुळे विकतचे पाणी घेणेही सामान्य नागरीकांना परवडत नाही तर पालिका प्रशासनही पाणी देत नाही त्यामुळे सामान्य जनतेने करायचे तरी काय ? असा संतप्त सवाला यानिमीत्ताने उपस्थित होत आहे. तर पालिकेचे पाणी पुरवठा कर्मचारी हे पाणी पुरवठा करताना भेदभाव करीत असल्याचाही आरोप यावेळी आंदोलनकर्त्या महिलांनी प्रशासनाकडे केला. पालिकेच्या मुख्याधिकार्यांनी शहरात एकदा फिरुन शहराची अवस्था व पाण्याची दाहकता लक्षात घ्यावी, सामान्य जनतेचे पाण्यासाठी होत असलेले हाल प्रशासनाने लक्षात घ्यावे त्यावर त्वरित उपाययोजना राबवुन शहराचा विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करुन नागरीकांना दिलासा द्यावा अशी एक मुखी मागणी नागरीकांतुन होत आहे.

दरम्यान पालिकेत सध्या प्रशासकीय राजवट सुरु असुन मुख्याधिकारी हेच शहराचे आता सर्वेसर्वा आहेत त्यामुळे शहराच्या विस्कळीत पाणी पुरवठ्याला तेच जबाबदार असुन नागरीकांना पाणी पुरवठा करण्याबरोबरच मुलभुत सुविधा देण्याची जबाबदारीही प्रशासनाचीच असल्याचा सुरु यावेळी आंदोलन स्थळी आळवण्यात आला. तर पालिकेकडुन सध्या सोडण्यात येत असलेल्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा व घाण येत असुन त्यावर तवंग निर्माण होत आहे तर त्या पाण्याला विशिष्ट प्रकारचा वासही येत असल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे.

# जावळीत उभ्या असलेल्या अनेक होर्डिंग्जची प्रशासनाच्या दप्तरी नोंदच नाही

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे होर्डिंग्ज मालकांचे उखळ पांढरे



**मेढा :** महाबळेश्वर पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या सातारा मेढा-केळघर-महाबळेश्वर त्याचबरोबर कुडाळ-पाचगणी या राज्यमार्गावर पर्यटकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात राहते. अशा या राज्यमार्गांवर त्याचबरोबर तालुक्यातील इतर ठिकाणी देखील अनेक लोखंडी होर्डिंग्ज दिमाखात उभे असलेले पाहायला मिळत आहेत. मात्र या फ्लेक्स होर्डिंग्जची प्रशासन दप्तरी नोंदच नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे फ्लेक्स होर्डिंग्ज मालकांचे उखळ पांढरे झालेले आहे.

हे फ्लेक्स मालक जाहिरातदारांकडून पैसे कमवून मालामाला झालेले आहेत. सातारा- मेढा-महाबळेश्वर हा राज्यमार्ग चौपदरी झाला असून या राज्य मार्गावरून महाबळेश्वरकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. याचाच फायदा उठवत बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या या राज्यमार्गाच्या कडेला जावळी तालुक्यातील काही व्यावसायिकांनी आपले उंचच्या उंच लोखंडी होर्डिंग्ज जाहिरातीसाठी उभे केले आहेत.हे होर्डिंग्ज प्रवाशांचे लक्ष देखील केंद्रीत करीत आहेत.यातून जाहिरातदाराची जाहिरात होतेय मात्र हे होर्डिंग्जची कोणतीही नोंद बांधकाम विभागाकडे ना महसूल प्रशासनाकडे नसल्याची माहिती समोर आली आहे.

हजारो भाडे जाहिरातदारांकडून आकारून हे होर्डिंग वाले चांगलेच मालामाल झालेले पाहायला मिळत आहेत. मेढा शहरापासून महाबळेश्वरकडे जाणाऱ्या मार्गावर आंबेघर, नांदगणे, त्याचबरोबर घाटातही काही ठिकाणी असे उंचच्या उंच होर्डिंग रस्त्याच्या कडेला धोकादायक स्थितीत उभे असलेले पाहायला मिळत आहेत. याकडे बांधकाम विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असून संबंधित होर्डिंगची नोंदणी करून घेतल्यास प्रशासनाच्या तिजोरीत महसूल स्वरूपात निधी देखील जमा होऊ शकतो, मात्र बांधकाम विभागासह महसूल प्रशासन देखील याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही .

असेच होर्डिंग्ज कुडाळ-पाचगणी रस्त्यावर देखील अनेक ठिकाणी नियमबाह्यपणे व कोणतीही नोंदणी अथवा परवानगी न घेता याही राज्यमार्गावर रस्त्याकडेला उभे करण्यात आलेले आहेत.

जावळी तालुक्यात नियमबाह्य तसेच अनधिकृतपणे जिथं जिथं नागरिकांचे लक्ष जाईल अशा ठिकाणी व्यासायिक विचारांनी होर्डिंग्ज उभे करण्यात आले आहेत.

# गरिबांच्या घराच्या रक्षणासाठी प्लास्टिक कागद अच्छादनाची लगबग

**सातारा :** पावसाच्या आगमनाला काही दिवस बाकी असतानाच सातारा जिल्ह्यातील अनेक खेड्यापाड्यात व शहरा नजीक गरिबांनी आपापल्या झोपडी वजा घर व शिवारातील शेती पिकांवर मिळेल ते प्लास्टिक अच्छादन करण्याच्या कामाला सुरुवात केलेली आहे. या लगबगीमुळे सध्या प्लास्टिक कागदाचा भाव चांगलाच वधारला आहे. नैऋत्य मोसमी पाऊस अंदमान परिसरात दाखल झाल्याची माहिती हवामान खात्याने दिल्यानंतर गोरगरीब व कष्टकरी शेतमजूर यांनी आपापली झोपडी वजा घरे व त्यावरील पत्रा गळती थांबवण्यासाठी आता प्लास्टिकच्या कागद व ताडपत्रीचा वापर सुरू केलेला आहे. सध्या पिवळा, निळा, काळा, सफेद अशा विविध रंगाच्या प्लास्टिकच्या कागदासोबतच सुतळी दोरी, नायलॉनच्या कागद व सुतळी त्याचबरोबर काही ठिकाणी रिबिट लावून अच्छादन टाकले जात आहे. सरासरी प्लास्टिकची कागदाची किंमत ही दिवसेंदिवस वाढत आहे. काही ठिकाणी वॉटरप्रूफिंग केले तरीसुद्धा प्लास्टिकचा कागद अच्छादन केल्याने स्लॅप वर सुरक्षितता येते. त्यामुळे अनेक जण प्लास्टिकचा वापर करतात. सर्वसामान्य



कष्टकऱ्यांना प्लास्टिकचे छत म्हणजेच निवारा वाटत आहे.

पावसाळ्याचे आगमन होत असल्याने शेतकरी वर्गाचे कडबा गजी तसेच उत्पादन केलेले धान्य व व्यापाऱ्यांच्या अनेक साहित्याची पावसापासून बचाव करण्यासाठी प्लास्टिकच्या कागदाला मागणी होत आहे. त्यामुळे बाजारपेठेत या प्लॅस्टिकच्या कागदासोबतच ताडपत्रीलाही महत्त्व आलेले आहे. मोठमोठे ट्रक व इतर वाहने यांच्यासाठी जाड व मजबूत अशी ताडपत्री टाकली जात आहे. त्याचबरोबर चार चाकी व दुचाकी वाहनांच्या संरक्षणासाठी सुद्धा प्लास्टिकच्या कागदाचा वापर केला जातो .

पावसापासून बचाव करण्यासाठी प्लास्टिक व रबरी रेनकोट, टोपी व इतर साहित्य साठी सुद्धा बाजारपेठेमध्ये खरेदी करण्यासाठी ग्राहकांची लगबग सुरू झालेली आहे. सातारा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी विशिष्ट अशा प्लास्टिकचा वापर केला जात असल्याने व्यापारी वर्गाने मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या साठा करून ठेवलेला आहे.

यामध्ये अनेकदा किमतींपेक्षा जास्त किंमत प्लास्टिकला आल्याने गोरगरीब व कष्टकरी, शेतमजूर व बेगर लोक हे रिकाम्या पोत्यापासून तयार केलेले कापड हे चांगल्या पद्धतीने शिवून त्याचा पुनर्वापर करत आहेत .त्यामुळे पावसाळ्यात चिंता मिटून गेलेली आहे. सध्या अनेक सामाजिक कार्यकर्ते व नेते आपला वाढदिवसानिमित्त अनेक ठिकाणी फटाक्याची आतिषबाजी व रंगीत पार्टी करतात.

# पाणी वितरण, हक्कदारी मिळणार

## मात्र निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यास पाण्याचा मुद्दा पेटणार

**मसूर :** : महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण'चे निर्णय, नियम, आदेश, हक्कदारी विषयक धोरण यांचे व २००५ चा पाणी वापर वितरण विषयक कायदा यांच्या प्रमाणेच पाण्याचे वाटप, वापर या गोष्टी झाल्या पाहिजेत. यांचा भंग होता कामा नये. असे स्पष्ट निर्देश यावेळी मंत्रालयात बैठकीत प्रधान सचिवांनी दिले. बैठकीत झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी न झाल्यास हजारोंच्या सहभागाने पाण्याचा मुद्दा पेटल्याशिवाय राहणार नाही असा इशारा श्रमिक मुक्ती दल पाणी संघर्ष चळवळ व प्रधान सचिव यांच्यात मंत्रालयातील बैठकीनंतर झालेल्या आढावा बैठकीत देण्यात आला.

पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांवर दबाव टाकून, त्यांना भिती दाखवत जलसंपत्ती नियमन प्रधिकरणचे नियम व आदेशांचे पालन न करता व्यवहार झाल्यामुळे लाखो शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. २००५ चा पाणी वापर, हक्कदारी विषयीचा कायदा पायदळी तुडवून हक्क धारकांना वंचित ठेवण्याचे प्रकार सर्रास होत आहेत. शेतकऱ्यांची पिके वाळत आहेत. लाखो रूपयांचे नुकसान होत आहे. पाणी उपलब्ध असूनही शेतकऱ्यांवरील अन्याय संपविण्यासाठी श्रमिक मुक्ती दल - पाणी संघर्ष चळवळीच्यावतीने अप्पर प्रधान सचिव जलसंपदा विभाग यांच्याकडे बैठकीची मागणी केली होती. त्यानुसार संबंधीत अधिकाऱ्यांसह ही बैठक मंत्रालयात झाली. यावेळी झालेल्या चर्चेत अप्पर प्रधान दिपक कपूर यांनी या संबंधीचे स्पष्ट आदेश दिले.

**शासनाच्यावतीने या बैठकीत कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांचा समावेश आहे. लाभक्षेत्र विकासचे प्रभारी सचिव या बैठकीस उपस्थित होते. श्रमिक मुक्ती दल-पाणी संघर्ष चळवळीच्यावतीने डॉ. भारत पाटणकर, रत्नाकर तांबे, नंदकुमार माने, रणजीत फाळके, अविनाश माने, सी.आर. बर्गे, प्रताप चव्हाण, जगदीश पवार, आनंदराव पाटील, दिलीप पाटील, संतोष गोयल असे सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामधील प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.**

**कालवे, उपसा सिंचन योजना समस्या संदर्भात बैठकीत सकारात्मक चर्चा**

सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील धोम, धोम-बलकवडी, तारळी, उरमोडी,कोयना व वारणा ही धरणे, अन् त्यांच्याशी संबंधीत योजना, कालवे व्यवस्था यांच्या बाबतीत प्रश्नांची सोडवणूक करण्याची सकारात्मक चर्चा यावेळी बैठकीत झाली. जिहे कठापूर, धोम बलकवडी कालवा, धोम कालवे यंत्रणा, उरमोडी कालवे, तारळी कालवे व उपसा बंद पाईप सिंचन टेंबू उपसा सिंचन, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन योजना, आरफळ कालवा, लोढे तलाव सिंचन व्यवस्था, आटपाडी - समग्र बंद पाईप यंत्रणा अशा सर्व क्षेत्रातील समस्यांचे तातडीचे उपाय काढून त्यासंदर्भातील निर्णय या बैठकीत झाले.

# किरकोळ वाद वगळता मतदान प्रक्रिया सुफळ संपूर्ण !

**मुंबई :** पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे मुंबईत मतदानाला गालबोट लागले नाही. काही ठिकाणी झालेले किरकोळ वाद पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला. शहरात शांततेत मतदान पार पडल्याचे मुंबई पोलिस दलातील कायदा व सुव्यवस्थेचे सहआयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी सांगितले.

मुंबईत सोमवारी झालेल्या मतदानावेळी पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलिस आयुक्त देवेन भारती यांच्या नेतृत्वात अपर पोलिस आयुक्त, पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्तांसह दोन हजार ७५२ पोलिस अधिकारी आणि २७ हजार ४६० पोलिस अंमलदार मतदान केंद्रांसह संवेदनशील आणि महत्त्वाच्या ठिकाणी तैनात होते. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी विशेष काळजी घेत दंगल नियंत्रण पथके आणि केंद्रीय सुरक्षा दलाची पथके तैनात केली होती.

आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी पोलिसांनी विविध ठिकाणी अदखलपात्र गुन्हे दाखल केले. साबुसिद्धिकी रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर धर्माच्या आधारे मतदान करण्याचे आवाहन केल्याप्रकरणीही सर जे. जे. मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रचाराचा अवधी संपल्यानंतरही समाज माध्यमांद्वारे प्रचार केल्याच्या आरोपाखाली डीएननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मालाड पूर्व येथील कुरार आप्पा पाडा परिसरात अंजली पाष्टे (५३) या महिलेला दारूच्या बाटल्यांसह ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी महिलेला सीआरपीसी कलम ४१(१) (अ) अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे.

# अमृत महोत्सवी वर्षात सातारा जिल्हा बँकेला १७९ कोटीचा नफा

**सातारा :** सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेला चालू आर्थिक वर्षात १७९ कोटी रुपयांचा नफा झाला आहे यामध्ये १४८ कोटी २२ लाख करोत्तर नफा झाला आहे . बँकेच्या ठेवी १० हजार ५११ कोटी ५० लाख रुपये कर्ज ७२९३ कोटी ३५ लाख रुपये आहेत याची माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन काका पाटील यांनी पत्रकार परिषदेतील

## अध्यक्ष नितीन पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई ,संचालक आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, आमदार बाळासाहेब पाटील, प्रभाकर घार्गे, दत्तानाना ढमाळ, प्रदीप विधाते इत्यादी यावेळी उपस्थित होते .

नितीन पाटील पुढे म्हणाले बँकेच्या स्वनिधीमध्ये ८३ कोटी ३९ लाख इतकी भरीव वाढ झाली असून बँकेचे एकूण स्वनिधी ९८८ कोटी ६१ लाख आहेत रिझर्व बँकेच्या सूचनेप्रमाणे सरकारी कर्ज रोखे आणि सुरक्षित गुंतवणूक ही ५१६९ कोटी आहे अनुत्पादक कर्ज चालू आर्थिक वर्षात ४८ कोटी २३ लाख असून एकूण कर्जाशी हे प्रमाण फक्त ०. ५७% आहे . निव्वळ अनुत्पादक कर्ज प्रमाण गेली १७ वर्ष शून्य टक्के आहे . बँकेने विकास संस्था सभासदांना साडेपाच ते आठ टक्क्याने व्याज सवलत दिली असून पाच कोटी व्याज परतावा तरतूद केली आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या प्रोत्साहन ६ लाख १८ हजार,व्यक्तिगत गोडाऊन बांधकाम व्याज प्रोत्साहन १ लाख ८४ हजार, शेतकरी कॅश क्रेडिट वसुली व्याज परतावा एक कोटी अशी मदत करण्यात आली आहे

सोळा वर्षापासून वेळेत कर्ज फेड करणाऱ्या शेतकरी सभासदांना तीन लाखापर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याजदराने उपलब्ध करून देण्यात आले आहे . बँकेच्या ९६३ विकास सेवा सोसायटी असून ९४७ पूर्णपणे नफ्यात आहेत. जिल्हा बँकेने १ मे २०२२ पासून अल्पमुदत पीक कर्जाच्या व्याजदरात ०.५० ते ३% पर्यंत कपात बँकेने केली आहे . विद्यार्थ्यांना देशांतर्गत तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी रुपये ३० ते ४० लाखापर्यंत शैक्षणिक कर्ज उपलब्ध केले आहे यशवंत किसन म्हणजे या व्यासपीठाची स्थापना करून जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना हक्काची व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे . बँकेच्या सर्व ठेवीदार कर्जदार खातेदारांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा असेल बँकेने भरण्याचा महत्त्वकांक्षी निर्णय घेतला असून दहा लाखापेक्षा जास्त ग्राहकांच्या वारसांना दोन लाखापर्यंत अपघात विमा संरक्षण मिळत आहे. बँकेने ८५ कोटीच्या नफ्यापैकी राखीव निधीसाठी २१ कोटी ७२ लाखाची तरतूद केली आहे शेतीपद्धतीसाठी १२ कोटी ७५ लाख रुपये तब्येत केली आहे. इमारत निधीसाठी १ कोटी, गुंतवणूक चढउतार ५ कोटी ,बुडीत कर्ज निधीसाठी २१ कोटी ६७ लाख टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट फंडासाठी साडेसात कोटी तर संपत्ती सोने भाव चढ उतार निधीकरिता ५० लाख रुपये इतकी तरतूद केली आहे.